भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६९५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/१०/२०१७

**१) निष्काळजीपने वाहन चालवुन रोडवर आडवे जाणारे डुक्करांना धडक मारून एकाचा मृत्यु व एक गंभिर जखमी :–**

दिनांक ०५/१०/२०१७ चे २३.३० वाजता दरम्यान यातील मृतक आरोपी डॉ. होमराज महादेव आळे वय ४२ वर्ष रा. सावरला हा त्याचे मोटार सायकलवर फिर्यादीस मागे बसवुन पवनी वरून सावरला येथे जात असता, यातील मृतक आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन रोडवरून आडवे जाणाऱ्या डुक्करांना धडक मारून गंभिर जखमी होवुन, स्वत:चे मरणास व मागे बसलेला फिर्यादी यास गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने, फिर्यादी बंडु मनिराम शेंडे वय ३२ वर्ष रा. सावरला यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३०४(अ),२७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी. ताजने पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलच्या धडकेत एकाचा मृत्यु व दोन जखमी :–**

दिनांक ०५/१०/२०१७ चे २०.०० वाजता दरम्यान यातील मृतक पुंडलीक काशिनाथ पाखमोडे वय ४६ वर्ष रा. सेलोटी हा दुर्गेश राईस मील मधुन त्याचे गावी सायकलने जात असतांना, मानेगाव ते पोहरा रोडवरील सेलोटी फाटया जवळील गुरूदेव दिघोरे यांच्या पाणठेल्या जवळ पोहरा गावाकडुन मानेगाव कडे जाणाऱ्या यातील आरोपी मोटार सायकल चालकाने मोटार सायकलवर डबल सिट बसवुन त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मृतकचे सायकलला धडक मारून त्याचे मरणास व स्वत: व मागे बसणाऱ्या ईसमास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने, फिर्यादी ताराचंद काशिनाथ पाखमोडे वय ४९ वर्ष रा. मानेगाव सडक यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७ ३०४(अ),भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी. चकाटे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०५/१०/२०१७ चे १०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ची अल्वयीन मुलगी हीला कोणीतरी अज्ञात आरोपीने पळवुन नेल्याने, फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि.फटींग पो.स्टे भंडारा करीत आहेत.

**४) क्षुल्लक कारणावरून संगनमत करून भांडण करून काठीने मारून तोंडाचा जबडा फॅक्चर केल्याने गुन्हा नोंद–**

दिनांक १४/०८/२०१७ चे २३.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी लंकेश कुंडलीक साठवणे वय २७ वर्ष रा. राजेद्र वार्ड शुक्रवारी भंडारा, यानी आरोपी क्र. याचे वडीलास गाडी घेता काय याबाबत सांगीतले म्हणुन आरोपी क्र. १ ने फिर्यादीस तु माझे वडीलास का सांगीतलास असे बोलुन आरोपी क्र. १ व २ यांनी संगनमत, भांडण करून आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे तोंडावर, पाठीवर काठीने मारून तोंडाचा जबळा फॅक्चर केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व एक्सरे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२५,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**५) एसीबी. भंडारा यांची कारावाई :—**

दिनांक ०६/१०/२०१७ चे १२.०५ वाजता दरम्यान यातील आरोपी यांनी तक्रारदार जयकृष्ण पतीराम गिन्हेपुंजे वय ४५ वर्ष रा. पद काळजीवाहक स्वावलंबी औद्योगींक अपंग निवासी कर्मशाळा सेंदुरवाफा यांना त्यांचे अपंगत्वाचा कसुरी अहवाल समाज कल्याण अधीकारी कार्यालयात न पाठवीण्या करीता तसेच त्यांना नौकरी वरून कमी न करण्या करीता, मागिल जुन, जुलै, ऑगष्ट या तीन महीण्याचे ३,२००/रु दर माह प्रमाने ९,६००/रु यांनी सप्टेंबर २०१७ पासुन ५,०००/रु प्रति माह प्रमाणे एकुन १४,६००/ रुपयाची लाचेची मागणी करून लाच रक्कम कोणत्याच प्रकारचा प्रतिकार न करता स्विकारतांना रंगेहात पकडल्याने पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ७,१३,(१)(ड),१३(२) ला.ड.प्र.का.१९८८ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस उपअधीक्षक सावरकर ए.सी.बी. भंडारा पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**६) विवाहीतेला शारीरीक व मानसीक त्रास दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १२/०६/२०११ ते ०६/१०/२०१७ पर्यत यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीस 'तिचे माहेरून पैसे आण या कारणा वरून' फिर्यादीस शारीरीक व मानसीक त्रास दिल्याने, फिर्यादीचे यांचे तोंडी व महिला समुपदेशन केन्द्र डोंगरगड (छ.ग.) यांचे अहवला वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४९८,(अ)३४, भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा सरोदे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**७) अवैध दारू अडयावर धाडी . :—**

दिनांक०६/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा व कारधा येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून १५ लिटर हातभट्टी दारु किंमती १५००/—रु, चा माल जप्त करण्यात आला.

07.10

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता